**प्रेसनोट** दिनांक –१७/०३/२०२१

श्रीमती मिना गिरिश सांडये वय – ५३ वर्षे, राज्य कर अधिकारी भाईदर विभाग, राहणार – ए/५, १५५, जे.पी.नगर, विरार (प) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ठाणे (कॅम्प पालघर) यांनी घेतले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे (कॅम्प पालघर) |
| २ | गुन्हा नोंद क्रमांक | भाईदर पोलीस ठाणे, मिरा भाईदर वसई विरार आयुक्तालय |
| ३ | कलम | स्टे.डा.नोंद क्र. २६/२०२१, वेळ १७:३७ वाजता दिनांक १७/०३/२०२१ |
| ४ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्रीमती मिना गिरिश सांडये वय – ५३ वर्षे, राज्य कर अधिकारी भाईदर विभाग, राहणार – ए/५, १५५, जे.पी.नगर, विरार (प) **वर्ग– २** |
| ५ | मागितलेल्या लाचेची रक्कम | ०५,०००/–रूपये. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | ०५,०००/– रुपये |
| ७ | थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार हे व्यवसायाने वकील आहेत. श्री. राजन चौरसिया हे आर.सी.स्टील कंपनी, पेल्हार, नालासोपारा पुर्व या कंपनीचे मालक असुन तक्रारदार हे कंपनीचे सल्लागार आहेत.<br>आर.सी.स्टील कंपनी, पेल्हार, नालासोपारा, पुर्व या कंपनीचे सन २०१६–१७ या कालावधीच्या अॅसेसमेंट ऑडर मिळणेकामी तक्रारदार यांनी वस्तु व सेवा कर विभाग, भाईदर (प) येथील राज्य कर अधिकारी श्रीमती मिना जी. सांडये यांची दिनांक १०/०३/२०२१ रोजी भेट घेतली असता, त्यांनी तक्रारदार यांचेकडे अॅसेसमेंट ऑर्डर काढण्यासाठी ५०००/–रूपये लाचेची मागणी केली. परंतु तक्रारदार व कंपनीचे मालक श्री. राजन चौरसिया यांना श्रीमती सांडये यांनी मागणी केल्याप्रमाणे लाचेची रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने तक्रारदार यांनी दिनांक १७/०३/२०२१ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कॅम्प पालघरकडे श्रीमती मिना सांडये, राज्य कर अधिकारी यांचे विरूध्द लेखी तक्रार दिली आहे.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक १७/०३/२०२१ रोजी तक्रारदार यांना आरोपी लोकसेविका यांचे कार्यालयात पंचासह पाठवून पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे कामाचे अनुषंगाने ०५,०००/–रू.लाचेची मागणी केली. तसेच दिनांक १७/०३/२०२१ रोजी सापळापुर्व व सापळा पंचनाम्यात लोकसविका हिने सदर लाचेची रक्कम १६:३५ वा. च्या सुमारास वस्तु व सेवा कर विभाग, १ ला माळा, एम.टी.एन.एल. बिल्डींग, भाईदर प., जि.ठाणे येथे त्यांचे कक्षात स्विकारली असता त्यांना अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे, (कॅम्प पालघर) कार्यालयाचे सापळा पथकाकडून रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे (कॅम्प पालघर) यांचेशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे (कॅम्प पालघर) पालघर प. ४०१ ४०४.
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– dypacbpalghar@gmail.com
ऑनलाईन तक्रार :– ––
अॅप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :– 1064
दुरध्वनी क्रमांक :– 02525-297297
व्हॉट्स अॅप क्र. :– 9552250404, 9923699430

पोलीस उप अधीक्षक, सत्यमेव जयते, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे (कॅम्प पालघर)

(भारत साळुखे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
ठाणे (कॅम्प पालघर)

Scanned with CamScanner